**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** सातारा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0383 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**10/09/2025 23:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 10/09/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/09/2025
**Time From (वेळेपासून):** 14:54 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:54 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/09/2025 **Time (वेळ):** 22:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 039
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/09/2025 22:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जि प, केंद्रिय प्राथमीक शाळा,सातारा खं, छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संगीता उत्तमराव भालेराव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1974

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गारखेडा परिसर, जानकी हटेल जवळ,आरबी हिल्स, जे बिल्डींग,छत्रपती संभाजीनगर,सातारा,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गारखेडा परिसर, जानकी हटेल जवळ,आरबी हिल्स, जे बिल्डींग,छत्रपती संभाजीनगर,सातारा,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9699726729

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सोमनाथ भागुजी भावले | | | 1. बी-2-24,, बीड बाय पास,, गट नं137, रो हाऊस,वसंत विहार, छत्रपती संभाजीनगर ,सातारा, छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | गणेश रामनाथ कोथंबीरे | | | 1. मारोती मंदिरा जवळ,सातारा गाव, ,छत्रपती संभाजीनगर, सातारा,छत्रपती संभाजीनगर |

पोलीस स्टेशन सातारा औरंगाबाद (शहर)



| | | | |
|---|---|---|---|
| | | | शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम 20,000/रुपये | 20,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 10/09/2025

मी संगीता उत्तमराव भालेराव, वय- 51 वर्ष, व्यवसाय- नौकरी, शिक्षक, जिल्हा परिषद, केंद्रीय उच्च प्राथमीक शाळा, सातारा गांव, छत्रपती संभाजीनगर रा. आर.बी. हिल्स, जे. बिल्डींग, गारखेडा परिसर, जानकी हॉटेल जवळ, छत्रपती संभाजीनगर, मो.क्र. 9699726729
समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालय येथे मा.श्रीमती संगीता पाटील, मॅडम पोलीस उप अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर यांचे समक्ष आज दिनांक 10/09/2025 रोजी येवून लेखी तक्रार देते की, मी वरील प्रमाणे असून सध्या जिल्हा परिषद, केंद्रीय उच्च प्राथमीक शाळा, सातारा गांव, छत्रपती संभाजीनगर येथे प्राथमीक शिक्षक म्हणून नेमणुकीस आहे. माझ्या घरी धार्मिक कार्यक्रम असल्याने मला रजेची आवश्यकता होती. त्यामुळे मी दिनांक 09/09/2025 रोजी आमचे शाळेचे मुख्यध्यापक श्री. सोमनाथ भावले यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात अर्जित रजेवर सोडणेबाबत विनंती करणेकरीता गेले असता, मला त्यांनी रजेवर जायचे असेल तर वीस हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणाले. त्यानंतर मी तेथून निघून आले.
तरी मी आज दिनांक 10/09/2025 रोजी आमच्या शाळेचे मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले सर यांना भेटण्यास जाणार आहे. माझ्या घरी धार्मिक कार्यक्रम असल्याने एक महिन्याचे अर्जित रजेवर सोडणेबाबत अर्ज घेवून जाणार आहे व त्यांना एक महिन्याचे अर्जित रजेवर सोडण्याकरीता विनंती करणार आहे. आपण आपल्या पथकासह येवून त्यांनी मला आर्जित रजेवर सोडण्याकरीता लाचेची मागणी केल्यास आपण त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी. मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले सर हे मला अर्जित रजेवर सोडण्याकरीता जे पैसे मागत आहेत. ती शासकीय फी नसून लाच मागत आहे. अशी माझी खात्री आहे.
माझा आणि आमचे मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले सर यांचा कोणताही पैसे देणे घेण्याचा व्यवहार नाही व वैर किंवा दुश्मनी नाही. तसेच मला मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले सर यांना लाच देण्याची इच्छा नाही. मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले सर यांनी माझ्याकडे अर्जित रजा मंजुरी करीता लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत लाच स्विकारल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी हि विनंती.
त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी मी दिलेली तक्रार उपस्थित असलेले त्यांच्या सोबतचे दोन शासकीय पंचास वाचण्यास दिली पंचानी ती तक्रार वाचल्या नंतर त्यावर पंचानी सहया केल्या व पोलीस उप अधिक्षक संगीता पाटील यांनी समक्ष म्हणुन सही केली.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक, श्रीमती संगीता पाटील यांनी मी दिलेल्या लाच मागणीचे तक्रारीचे अनुषंगाने प्रथम लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय माझे व पंचांचे संमतीने घेतला. त्या प्रमाणे लाचमागणी पडताळणी संदर्भात

त्यांनी मला व पंचास तसेच पथकातील सदस्यांना आवश्यक सुचना दिल्या. तसेच सदर लाचमागणी पडताळणीमध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे मला सांगीतले .
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक संगीता पाटील मॅडम यांनी मला, माझे व पंच क्र.1 श्री. अविनाश काकाराव पगारे, यांना सुचना दिल्या तसेच व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन मी, व पंच यांना मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले, यांची भेट घेण्या करीता मी माझेकडील दुचाकी वाहन क्रमांक MH-20-DZ-3367 या वाहनाने व माझ्या सोबतचे पंच दुसऱ्या दुचाकी वाहनाने माझ्या सोबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथून दिनांक 10/09/2025 रोजी 09.58 वा. रवाना केले. त्यानंतर मी व पंच जि.प.कें.प्रा. शाळा, सातारा (ख)., ता. जि.छत्रपती संभाजीनगर येथे गेले व मुख्यद्यापक, श्री. सोमनाथ भावले, यांची भेट घेतली व माझे अर्जित रजे संदर्भाने चर्चा केली. तसेच सदरवेळी मुख्यद्यापक हे मला म्हणाले की तुम्हाला रजेवर सोडणेकरीता 20,000/- रुपये दयावे लागतील असे सांगीतले. त्यावेळी मी मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले सर यांना सांगितले की, मी दुपारी जेवणाच्या सुट्टीमध्ये जावून पैसे घेवून येते. त्यावर मी त्यांना किती करायचं फिक्स आकडा सांगा म्हणजे असे म्हणाले त्यावर मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले यांनी वीस हजार असे म्हणाले त्यावर मी म्हणाले की दुपारच्या सुट्टीमध्ये घेवून येते. त्यावर मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले सर यांनी दुपारच्या सुट्टीमध्ये घेवून या असे सांगितले. त्यामुळे मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आलो.
तेथे पोलीस उप अधीक्षक पाटील मॅडम यांनी पंचा समक्ष माला घडलेल्या घटने बाबत विचारणा करुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील संभाषण ऐकले असता त्या मध्ये मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले यांनी माझ्याकडे माझे अर्जित रजा मंजुरी संबंधी चर्चा करुन माझ्या कडे मुख्यद्यापक श्री. सोमनाथ भावले सर यांनी त्यांचे कार्यालयात 20,000/- रुपये लाच मागणी केल्याचे व लाचेची रक्कम सदर ठिकाणी दुपारच्या सुट्टीमध्ये घेऊन येण्याचे स्पष्ट झाले.
त्याअनुषंगानेमा.पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम, मी व शासकीय पंच असे आम्ही एकमताने आजच सापळा कारवाई आजमावण्याचा निर्णय घेऊन मुख्यद्यापक सोमनाथ भावले यांना लाच म्हणुन देण्याची रक्कम रु.20,000/- ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 40 चलनी नोटा मी पोलीस उप अधीक्षक, संगीता पाटील यांचे समक्ष हजर केल्या. सदर नोटांचे क्रमांक एका कागदावर लिहुन सदर कागद पंच क्र.2 श्री संजय सोनवणे, यांचेकडे देण्यात आला व लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लाऊन सदर रक्कम माझ्याकडे दिली व व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन माझ्या कडे दिले. त्यानंतर मी व पंच मुख्यद्यापक सोमनाथ भावले, यांची भेट घेण्याकरीता सुरक्षीत ठिकाणा वरुन 14.21 वा. मी माझ्याकडील दुचाकी वाहनाने व पंच हे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने माझ्या सोबत असे आम्ही रवाना झालो. तसेच श्रीमती संगीता पाटील मॅडम व सापळा पथक असे आमचे पाठीमागे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने जिल्हा परिषद, केंद्रीय प्राथमीक शाळा, सातारा (खं) छत्रपती संभाजीनगर येथे पोहोचल्या नंतर माझी, मुख्यद्यापक, सोमनाथ भावले, यांची भेट झाली. त्यावेळी मुख्यद्यापक भावले यांनी मला अर्जित रजेवर सोडण्याकरीता 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम शाळेत काम करणारा खाजगी व्यक्ती गणेशकडे लाचेची रक्कम देण्यास मला सांगितले. त्यावर मी माझ्या पर्समध्ये ठेवलेली लाचेची रक्कम काढुन गणेश यांचेकडे दिली. सदरची रक्कम गणेश कोथंबीरे यांनी स्वीकारली व त्यांचे पॅन्टेच्या समोरील डाव्या खीश्यात ठेवली. त्यानंतर मी व माझ्यासोबत पंच असे आम्ही मुख्यद्यापक यांचेशी माझ्या अर्जित रजे विषयी चर्चा करीत शाळेच्या मुख्य गेट जवळ आले. त्यावेळी मी सापळा पथकास दिसेल अशा रितीने लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला. ती वेळ 14.54 वा. ची होती त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी पंच क्र.2 असे सदर घटनास्थळी आले.
त्यानंतर सापळा पथकाने मुख्यद्यापक सोमनाथ भावले व गणेश रामनाथ कोथंबीरे यांना ताब्यात घेतले त्यानंतर पो. उप.अधी. पाटील मॅडम यांचे सुचनेवरुन गणेश रामनाथ कोथंबीरे यांनी स्विकारुन त्यांचे पँटचे खिशात ठेवलेली लाचेची रक्कम 20,000/- रुपये पंच क्र.2 श्री.संजय राजाराम सोनवणे, यांनी हस्तगत केली व सापळा पुर्व कारवाईचे वेळी लिहीलेले नोटांचे क्रमांक व गणेश रामनाथ कोथींबीरे यांचे कडुन ताब्यात घेतलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहीले असता सदर नोटा सारख्याच असल्याची सापळा पथकाची खात्री झाली.
त्यानंतर मुख्यद्यापक सोमनाथ भावले यांना पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी स्वत:चा परिचय देवुन त्यांना त्यांचे संपुर्ण नाव गाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव 1) सोमनाथ भागुजी भावले, वय 52 वर्षे, पद-मुख्यद्यापक (जिल्हा परिषद, केंद्रीय प्राथमीक शाळा, सातारा (खं), ता.जि.छत्रतपी संभाजीनगर राहणार- वसंत विहार, गट नं.137, रो हाऊस नं. बी-2-24, बीड बाय पास, छत्रपती संभाजीनगर 2) खाजगी व्यक्ती गणेश रामनाथ कोथींबीरे, वय 26 वर्षे, व्यवसाय- खाजगी नौकरी, राहणार- मारोती मंदिरा जवळ, सातारा गाव, छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले.

करीता दिनांक 10/09/2025 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान मुख्याध्यापक सोमनाथ भागुजी भावले यांनी मला अर्जित रजेवर सोडणेकरीता 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन सदर लाच रक्कम आज दिनांक 10/09/2025 रोजी 14.54 वा. जिल्हा परिषद, केंद्रिय प्राथमीक शाळा, सातारा (खं), छत्रपती संभाजीनगर, येथे मुख्याध्यापक सोमनाथ भागुजी भावले यांचे सांगणेवरुन खाजगी ईसम गणेश रामनाथ कोथंबीरे यांनी स्विकारली म्हणुन माझी 1) सोमनाथ भागुजी भावले, वय 52 वर्षे, व्यवसाय - नौकरी, पद- मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, केंद्रीय प्राथमीक शाळा, सातारा (खं), छत्रपती संभाजीनगर 2) खाजगी ईसम गणेश रामनाथ कोथींबीरे, वय 26 वर्ष, राहणार- मारोती मंदिरा जवळ, सातारा गाव, छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली बरोबर व खरी आहे. वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन गा.पो.नि.सो यांचे आदेशाने DOअधिकारी मपोउपनि राख यांनी गुन्हा दाखल करुन मा.पो.नि.सो यांचे आदेशाने पुढील तपास कामी, पोलीस उपअधिक्षक श्रीमती संगीता पाटील, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर. यांचेकडे दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
NIRMALA TRIMBAK RAKH
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PSI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस स्टेशन सातारा
औरंगाबाद (शहर)



14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**(ड्युटी ऑफिसर)**
**पोलीस ठाणे सातारा**

**Signature of Officer in-charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Krushnachandra kes
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN74603

**पोलीस स्टेशन सातारा**

## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र

**District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर

**P.S. (पोलीस ठाणे):** सातारा

**1. G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 041

**2. G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 10/09/2025 23:46 वाजता

**3. G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** इतर

**4. Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** NIRMALATRIMBAKRAKH /पोलीस उपनिरीक्षक

**5. Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**

**6. G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

यावेळी आम्ही D.Oअधिकारी, मपोउपनि/राख नोंद करतो की, पोलीस ठाणे सातारा, छत्रपती संभाजीनगर शहर गु.र.न. 383/2025 कलम 7, 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम -1988 प्रमाणे दाखल केला असुन नमुद गुन्ह्याचा तपास अधिकारी नियुक्त करतेवेळी त्यांचा आय डी. CCTNSप्रणाली मध्ये उपलब्ध नसल्यामुळे आमच्या आय डी वापर करुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपअधिक्षक श्रीमती संगीता पाटील, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे देण्यात आला आहे. करीता नोंद.

**7. G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**

नोंद.

**8. Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

(ड्युटी ऑफिसर)
पोलीस ठाणे सातारा,
छत्रपती संभाजीनगर

**Report Printed on**
**(अहवाल मुद्रित केलेला दिनांक):** 10/09/2025

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name (नाव):** Krushnachandra keshvrao Shinde

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

**Name (नाव):** Krushnachandra keshvrao

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** POBN74603